**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **हरियाणा विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा कॉँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप, बिहार निवडणुकीत अपयशाच्या भीतीने राहुल गांधी यांचे वक्तव्य असल्याची भाजपाची टीका.**
2. **नागपूर जिल्ह्यात २७ नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज: जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांची माहिती.**
3. **शीख धर्माचे संस्थापक, गुरु नानक यांच्या जयंती निमित्त, सर्वत्र विविध आयोजन, नागपुरात काढण्यात आली शोभायात्रा.**
4. **नागपूरच्या विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस बुद्धविहारचा २६वा वर्धापनदिन, कामठीत मोठ्या उत्साहात साजरा.**

---------------------------------------------

**राहुल गांधी**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी, पत्रकार परिषद घेत, हरियाणा विधानसभा निवडणुकीत, गैरप्रकार झाल्याचे आरोप केले. हरियाणा विधानसभा निवडणुकीत, २५ लाख बनावट मतदार तयार करण्यात आले असा गंभीर आरोप, गांधी यांनी केला. यावेळी एकाच छायाचित्राच्या नावासमोर वेगवेगळी नावं असल्याचं गांधी यांनी निदर्शनास आणून दिलं तसंच, दुबार मतदार आणि मतदारांचे चुकीचे पत्ते, मतदार यादीत नोंदवले गेल्याचा आरोप केला. दरम्यान, बिहारच्या निवडणुकीत यश मिळणार नाही हे लक्षात आल्यावर कॉँग्रेस नेता राहुल गांधींनी, हरियाणातला बनावट मतदारांचा मुद्दा उपस्थित केल्याची टीका, केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते, किरेन रिजीजू यांनी, नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत केली.

---------------------------------------------

**हर्षवर्धन सपकाळ**

भारतीय जनता पक्ष निवडणूक आयोगाच्या मदतीनं मतचोरी करून सरकारच चोरत आहे असा, आरोप कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष, हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. सेवाग्राम इथं ते बोलत होते. राहुल गांधी यांनी, हरियाणातील मतचोरीचे ठोस पुरावे, देशासमोर

मांडले असूनही, निवडणूक आयोग त्याची दाखल घेत नसल्याची टीका त्यांनी केली. निवडणूक आयोग सरकारच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोप देखील सपकाळ यांनी केला.

-----------------------------------------------

**स्थानिक स्वराज्य संस्थां**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, महायुतीतील तीनही पक्ष आपापल्या स्तरावर, युती संदर्भात निर्णय घेतील असं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते आज कोल्हापूर इथं, पत्रकारांशी बोलत होते. या निवडणुकीत, जनता मोठ्या प्रमाणात, महायुतीलाच कौल देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २२ सेकंद)***

***निवडणुकांची घोषणा झाली आहे आम्ही त्या निवडणुकांना सामोरे जाऊ. तीनही आमचे जे पक्ष आहेत, ते आपापल्या परीनं त्या त्या स्तरावर युतीच्या संदर्भात निर्णय घेतील. पण कुठल्याही परिस्थितीमध्ये आम्ही तिघंही एकच आहोत. कुठे युती झाली नाही तरी आमची पोस्टपोल युती होईल. त्यामुळे मला असं वाटतं की या नगरपालिकेच्या निवडणुकीत महाराष्ट्राची जनता मोठ्या प्रमाणात आमच्या महायुतीलाच कौल देईल.***

-----------------------------------------------

**जिल्हाधिकारी ईटनकर पत्रपरिषद**

राज्य निवडणूक आयोगानं काल जाहीर केलेल्या, नगरपरिषद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक कार्यक्रमांनुसार, नागपूर जिल्ह्यातील २७ नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणूक तयारीची माहिती आज जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

***(होल्ड बाईट-जिल्हाधिकारी ईटनकर 47 सेकंद)***

***आपल्या जिल्ह्यामध्ये जवळपास २७ ठिकाणी लोकल बॉडीच इलेक्शन होत आहे. यामध्ये जवळपास ३७४ प्रभाग आहेत ५४६ सदस्यसंख्याचे निवडणुकीला पार पडणार आहे. त्यानंतर २७ अध्यक्ष पदासाठी इलेक्शन होणार आहे. या सगळ्या प्रक्रियेमध्ये जवळपास ७ लाख ३२ हजार १३२ मतदार राहील. यांच्यामध्ये जवळपास ८९१ मतदान केंद्र आहे. २७ निवडणूक निर्णय अधिकारी आहे. २७ अतिरिक्त ARO याच्यामध्ये राहील आणि डायरेक्टली किंवा इनडायरेक्टली जवळपास साडेचार हजार ते पाच हजार निवडणूक अधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये पार्ट घेणार आहे. या इलेक्शनसाठी लागणार साहित्य PO, CO***

***सगळं आपल्याकडे मुबलक प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत, याचा एफएलसी सुद्धा झालेला आहे. त्याचा डेटाबेस तयार करणे सुरु आहे. त्यामुळे नागपूर जिल्ह्यातमध्ये सगळे ARO, RO सगळी टीम तयार आहे.***

या निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयोगानं एक हजार ७८ कंट्रोल युनिट आणि दोन हजार १५८ बॅलेट युनिट उपलब्ध करून दिले असल्याची माहिती, जिल्हाधिकारी यांनी दिली. या निवडणुकीकरिता, मुख्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी, एक जुलै २०२५ रोजी उपलब्ध करून दिलेली मतदार यादी, ग्राह्य धरली जाणार असून, ज्या नागरिकांची नावे मतदार यादीमध्ये, दुबार आली आहे त्यांना, एकाच ठिकाणी एकाच वार्डामध्ये मतदान करता येईल. त्यांच्याकडून तसं हमीपत्र भरून घेण्यात येईल असं देखील जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं. याप्रसंगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर ग्रामीणचे पोलीस आयुक्त, डॉ.हर्ष पोद्दार, नगरपालिका प्रशासन, जिल्हा सह-आयुक्त, विनोद जाधव उपस्थित होते.

---------------------------------------------

**डॉ.एस. जयशंकर**

हिंद-प्रशांत क्षेत्रात, स्थैर्य कायम ठेवण्यात, भारत आणि जपान यांच्यातली भागीदारी, महत्त्वाची भूमिका बजावते असं प्रतिपादन, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं, ८व्या भारत-जपान, हिंद-प्रशांत मंचाला ते संबोधित करत होते. गेल्या काही दशकांमध्ये या दोन्ही देशांमधली भागीदारी आणखी मजबूत झाली असल्याचं त्यांनी सांगितलं. दोन्ही देशांनी आपापल्या बलस्थानांचा योग्य वापर करण्याचं आवाहन करताना ते म्हणाले…

**(*होल्ड बाईट- डॉ.एस.जयशंकर*)**

***The India Japan partnership must focus on leveraging our strengths, bolstering our supply change and investing in artificial intelligence, semiconductors, critical minerals, clean energy and space. As 2 major democracies and maritime nations, India and Japan have a larger responsibility towards the Indo Pacific, the Indo Pacific Oceans Initiative. Where Japan College the maritime trade, transport and connectivity pillar has the potential to advanced our contributions.***

नुकत्याच झालेल्या पूर्व आशिया परिषदेत, जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री, तोशिमित्सू मोतेगी यांच्याशी झालेल्या चर्चेत, दोन्ही देशांमधल्या भागीदारीचा तपशीलवार आढावा घेण्यावर एकमत झाल्याची माहिती, जयशंकर यांनी दिली.

-----------------------------------------------

**आंतरराष्ट्रीय परिषद व्हीएनआयटी**

विश्वेश्वरया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था अर्थात व्ही.एन.आय.टी., नागपूरच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागात, सहा ते सात नोव्हेंबर दरम्यान "कम्युनिकेशन, एम्बेडेड सिस्टम्स, मशीन लर्निंग आणि सिग्नल प्रोसेसिंगमधील पॅराडिम बदलांवरील चौथी आंतरराष्ट्रीय परिषद" आयोजित केली जाणार आहे. या परिषदेकरिता, जगभरातून तब्बल २९६ शोधनिबंध प्राप्त झाले असून, त्यापैकी १२५ निवडक निबंध, सादर केले जाणार आहेत.

-----------------------------------------------

**गुरु नानक देव जयंती**

शीख धर्माचे संस्थापक, गुरु नानक यांची आज, ५५६वी जयंती साजरी होत आहे. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी, गुरुनानक जयंतीनिमित्त, शुभेच्छा दिल्या आहेत. गुरुनानक यांचं जीवन, आपल्याला सत्य, न्याय आणि सहिष्णुता या मूल्यांची शिकवण देतं, प्रत्येकानं गुरु नानक देव यांचे आदर्श आपल्या जीवनात आत्मसात करावे आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करावे असं आवाहनही, राष्ट्रपति मुर्मू यांनी आपल्या संदेशात केलं. गुरु नानक देवांचं जीवन आणि संदेश मानवतेला चिरस्थायी मार्गदर्शन आणि प्रेरणा देणारा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, गुरु नानक जयंती निमित्त देशभरात लंगर, भजन, कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचं आयोजंन करण्यात आलं आहे. शीख धर्माचे संस्थापक, गुरुनानक देवजी यांच्या ५५६व्या प्रकाश पर्व निमित्त, नागपुरातील जरीपटका स्थित, श्री कलगीधर सत्संग मंडल द्वारा, झाकीसह भव्य शोभायात्रा काढण्यात आली. राज्याचे माजी मंत्री आणि आमदार डॉ.नितीन राऊत, माजी आमदार डॉ.मिलिंद माने, राजे मुधोजी भोसले यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते संगत, पूजा अर्चना आणि आरती, श्रीगुरुग्रंथ साहिबच्या समोर करण्यात आली. अरदास केल्यानंतर, शोभयात्रेला प्रारंभ करण्यात आला. शहराच्या जरीपटका भागात ही शोभायात्रा काढण्यात आली. जागोजागी याचं नागरिकांच्या वतीनं फटाके फोडून, रांगोळी काढून, पुष्पवृष्टी करून पूजा करून, स्वागत करण्यात येत आलं.

-----------------------------------------------

**ड्रॅगन पॅलेस**

कार्तिक पौर्णिमेच्या पवित्र पर्वानिमित्त, वैभवशाली आणि शांततेचं प्रतीक असलेल्या, विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस बुद्धविहारचा, २६वा वर्धापनदिन कामठीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी जपान इथून आलेल्या भिक्षु संघांच्या उपस्थितीत, विशेष बुद्धवंदना आणि धम्मदेशना आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाला ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या प्रमुख आणि ओगावा सोसायटीच्या अध्यक्षा ॲड.सुलेखा कुंभारे उपस्थित होत्या. मोठ्या संख्येनं नागरिकांनी या वर्धापन दिन सोहळ्यात, सहभागी होऊन, बुद्धवंदनेत भावपूर्ण सहभाग नोंदविला. वर्धापन दिनानिमित्त, तीन दिवसीय ड्रॅगन पॅलेस फेस्टिव्हलचं आयोजन करण्यात आलं असून, विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून, या उत्सवाला वैशिष्ट्यपूर्ण रंगत प्राप्त झाली आहे.

-----------------------------------------------

**परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन**

अमरावती इथं आयोजित तिसऱ्या, परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी शेतकरी आंदोलक आणि सामाजिक कार्यकर्ते तसंच 'गांधी का मरत नाही?' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक, चंद्रकांत वानखडे यांची निवड झाली आहे. अमरावतीच्या, परिवर्तन प्रबोधिनी या संस्थेनं, २० आणि २१ डिसेंबर रोजी हे साहित्य संमेलन आयोजित केलं असून, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळानं, या संमेलनासाठी अनुदान दिलं आहे.

-----------------------------------------------